
Vol. 5 | No. 5 | October

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal




Special Issue On

## IMPACT OF SOCIAL MEDIA ON SOCIETY

Guest Editor
Dr. Vasant Satpute

Associate Editor
Dr. M. D. Kachave

Assistant Editors
Dr. B. V. Andhale
Dr. M. G. Somvanshi
Dr. A. B. Sarkale

Parbhani

IMPACT FACTOR:4.197(IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

VOL. 5 NO. 5 SPECIAL ISSUE OCTOBER 2019

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue On

# IMPACT OF SOCIAL MEDIA ON SOCIETY

(Book 2)

*Guest Editor*

**Dr. Vasant Satpute**

*Associate Editor*

**Dr. M. D. Kachave**

*Assistant Editors*

**Dr. B. V. Andhale**

**Dr. M. G. Somvanshi**

**Dr. A. B. Sarkale**

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com

Late Ramesh Wa... Sonpeth College, Dist. Parbhani

४३. समाज माध्यमे आणि समाज / **डॉ. मिरा वि. फड** | **198**

४४. सोशल मिडिया ही तत्कालीन परिस्थितीत काळाजी गरज /
**डॉ. गंगणे आर. व्ही.** | **202**

४५. सोशल मिडियाच्या माध्यमातून होणारे लैंगिक गुन्हे /
डॉ.शिवाजी परळे | **208**

४६. समाजमाध्यमांचा समाजावरील प्रभाव / **बांगर नितीनकुमार बा .** | **215**

४७. सोशल मिडिया आणि फेकन्युज / **डॉ. आंधळे बी. व्ही.** | **218**

४८. समाज माध्यमाचे दुष्परिणाम / **डॉ. जाधव अशोक का.** | **221**

४९. छावा व किशोर मासिकाने प्रसिध्द केलेल्या साहित्याचा विषयनिहाय व साहित्य निहाय अभ्यास / **अशोक मा. बांगर** | **225**

५०. मुलांच्या मुद्रित प्रसार माध्यमातील साहित्याची मुलांसाठीची उपयुक्तता /
**अशोक मा.बांगर** | **228**

५१. सामाजिक माध्यमांचे परिणाम व उपाय / **डॉ.भिसे आर.एम.** | **231**

५२. सोशल मिडीया : मानवी जीवनावर पडलेला प्रभाव /
**डॉ.कोटीवाले व्हि.एम.** | **236**

५३. प्रसारमाध्यमे : स्वरूप, उद्गम आणि विकास /
डॉ.सा.द.सोनसळे | **239**

५४. व्यक्तिसंबंधावर सोशल मिडीयाचा प्रभाव : बिघडते सामाजिक संबंध /
**वंदना गायकवाड** | **243**

५५. सोशल मीडियाचा समाजमनावरील दुष्परिणाम : एक अभ्यास /
**डॉ. रामानंद बा. व्यवहारे** | **247**

५६. सोशल मिडिया का समाज पर प्रभाव / **बांगर आकाश शे.** | **255**

५७. समाज और सोशल मीडिया / **डॉ.मारोती उ. खेडेकर** | **259**

५८. विश्वभाषा हिन्दी और मिडिया / **डॉ.कुलकर्णी वनिता बा.** | **262**

५९. सोशल मीडिया और सामाजिक संबंधोंपर सैद्धांतिक नजरिया /
**विनय कुमार** | **269**

६०. सोशल मीडिया रिपोर्टिंग का सवाल / **डॉ. वडचकर एस.ए.** | **273**

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth

53

# प्रसार माध्यमे : स्वरूप, उद्‌गम आणि विकास

प्रा.डॉ.सा.द.सोनसळे,
सहयोगी प्राध्यापक, मराठी.
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ जि.परभणी.

आधुनिक युग हे माहिती आणि प्रसार माध्यमांचे युग आहे. डिजीटल जग ही आजच्या जगाची ओळख आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात माहिती आणि तंत्रज्ञानाने शिरकाव केला आहे. भाषेत नव्हे तर जगण्याच्या प्रत्येक क्षेत्रात या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या शब्दांनी आपले स्थान पक्के केले आहे. या क्षेत्राची भाषा इतर स्थानिक भाषांना मोहिनी घालत आहे. प्रसारमाध्यमांनी जीवनाच्या सर्व क्षेत्रातली माहिती अगदी सर्वसामान्यापर्यंत पोहोंचविली आहे. वर्तमान जीवनाबरोबरच अनेक तर्क या क्षेत्रात लावण्यात येत आहेत. जीवनात अनुलाग्र असा बदल झालेला दिसेल. मानवी जीवनातून खोटेपणा पूर्णपणे नष्ट झालेला नाही. परंतु त्याला मोठया प्रमाणावर आळा बसला आहे. भारतीय संस्कृतीही खरेपणासाठी आग्रह धरत होती. तोच खरेपणा आज काही प्रमाणात अनुभवावयास मिळतो आहे. यंत्रयुगात नियोजन बध्द चो–या होत नाहीत असे नाही. चो–या वाढत आहेत. पण चोरी केल्यानंतर संपत्ती कुठे आणि कशी लपवून ठेवावयाची हा प्रश्न भेडसावतो आहे.

गेली वीस–पंचवीस वर्षामध्ये उदारीकरणांनी वेग घेतला आहे. शेती, आरोग्य, सेवा, उद्योग,शिक्षण, चित्रपट, संगित, साहित्य आणि प्रसारमाध्यमे या क्षेत्रामध्ये झपाटयाने अनेक स्थित्यंतरे झाली. यातल्या काही क्षेत्रात तर नव्या तंत्रज्ञानाने चेहरा मोहराच बदलून टाकला आहे. कोलंबिया जर्नालिझम रिव्हयू मधील अलिकडच्या लेखानुसार सन 2021 पर्यंत भारतातील जवळपास 64% लोकसंख्या ही अगदी तरूण असेल त्यात 20 ते 35 वयोगटातील जनसंख्या अधिक असेल. म्हणजेच भारत हा जगात सर्वात तरूण लोकांचा देश असेल.

'मोबाईल नॉव्हेल' ही मोबाईलवर लिहिली गेलेली कादंबरी होय. जपानमध्ये या कादंबरीचा सर्वप्रथम प्रयोग झाला. हा तरूणांच्या आवडीचा साहित्यप्रकार आहे. वाचकांना थेट ई–मेलदवारे वाचकांपर्यंत पोहोंचविली जाते. ऑनलाईन पैसे भरून तिचे वाचन करता येते. या बरोबरच दुसरा प्रकार हा ऑडिओ बुकचा आहे. ऑडिआ बुक म्हणजे बोलके पुस्तक, इंग्रजीमध्ये ॲमेझॉन हे ऑनलाईन बुक स्टोअर Audible या ॲपच्या माध्यमातून बोलकी पुस्तके विकत घेतली जातात. युरोप, अमेरिकेत ऑडिओ बुकची वार्षिक उलाढाल नऊ हजार कोटीवर पोहोंचली असल्याचे समजते. तिकडे अशा पुस्तकांना खूप मोठा प्रतिसाद मिळतो आहे. त्या प्रमाणात भारतात त्याचा प्रसार झाला नाही. चीन मध्ये मोबाईल कादंबरी सारखेच पहिल्यांदा 'मोमिक्स' सुरू झाले आहे. मोमिक्सचा पहिला प्रयोग अमर चित्रकथेने केला. आणि तो यशस्वी झाला. सध्या हा प्रयोग इंग्रजी भाषेत पहायला मिळतो. तो पुढे जगातील इतर भाषेतही पहायला मिळेल असे दिसते.

आजच्या काळात मोबाईल किंवा कॉम्प्युटर आपण अनेक पुस्तके वाचू शकतो. ग्रंथालयात जाण्यास वेळ नसेल तर आपण आपल्या घरी बसून नेटवर वर्तमानपत्रे वाचू शकतो. तसेच पुस्तके दुर्मिळग्रंथ सुद्धा वाचू शकतो. ''बुकगंगा ' या साईटवर आपण जर शोध घेतला तर आपणास कादंबरी – 4997 कवितासंग्रह 3832 मार्गदर्शन पर 3847, व्यक्तिचित्रे 3050, ऐतिहासिक 2896, आरोग्यविषयक 2609, चरित्र 2436, वैचारिक 1846, साहित्यावर 1472,नाटक 1416, दिवाळी अंक 1373, पाकशास्त्र 1342, साहित्य आणि समीक्षेची 1245, वेगवेगळ्या विषयावरील लेख 1121, ललितसाहित्याचे 879, बालसाहित्य 9433, कथासंग्रह 6233, आत्मकथनं 703, आत्मचरित्र 695, कथा 6803, स्त्रिविषयक 674, स्पर्धापरिक्षा 670, कॉमिक्स 659, विनोदी 653, या बरोबरच आपणास हेही वाचता येईल एकूण इ–बुक्स 12,431, तर फ्रीबुक्स 414, वाचावयास उपलब्ध आहेत. ऑडिसो बुक्स मध्ये–23 कविता संग्रह, 13 नाटके, 06, कांदब–या, 22 व्यक्तिचित्रण बालसाहित्याची 05, 02

आत्मचरित्र, 09, कथासंग्रह तर धार्मिक साहित्याची 05 पुस्तके उपलब्ध आहेत.

इमेल, व्टिटर, फेसबुक , टी.व्ही., मोबाईल, रेडिओ, वर्तमानपत्र, हया मधून जगातील कोणतीही माहिती क्षणार्धात उपलब्ध होते. थक्ककरुन सोडणारे हे वास्तव आज आपण अनुभवत आहोत. या बरोबरच इ–साहित्यबुक. com, मायबोली com., नेटभेट. com. रसिक. com, अक्षरधारा. com., ग्रंथव्दार. com., मातृभारती. com., साहित्य प्रतिष्ठा. com. या वेबसाईटवरुन आपण विविध विषयांची ग्रंथाची आजतागापत माहिती घेवू शकतो. "1

आज आपण ज्या वर्तमानपत्राविषयी माहिती घेतो. ते वर्तमान पत्र सुरुवातीला बंगालमधून सुरु झाले. "भारतीय भाषांमधून पहिली वृतपत्रे सुरु करण्याचा ऐतिहासिक प्रयत्न राजाराम मोहन रॉय यांनी केला. ' संवाद कौमुदी' हे बंगाली भाषेत आणि 'मिरात – अल अरवबार ' हे पार्शियन भाषेत अशी वृतपत्रे त्यांनी सुरु केली. या वृतपत्रांची भूमिका पुरेशी स्पष्ट होती." 4 डिसेंबर 1821 रोजी ही पत्रे सुरु झाली. नव्या जाणिवा नव्या ज्ञानाची आस आणि लोक जागृतीचे साधन अशी भूमिका रॉय यांनी घेतली होती." 2. या माध्यमामुळे सामान्य माणसाला आपला आधार वाटतो. शासन आणि प्रशासनाला वर्तमानपत्रे समाजाकडे लक्ष द्यायला सांगतात आणि त्याचा परिणाम सुदधा होत असतो. आज तर इंटरनेटवर दैनिक वाचायला मिळतात. यामुळे ताज्या बातम्या वाचायला मिळतात.

'आकाशवाणी' या माध्यामाला जगात सुरुवात झाली. सर्वप्रथम 1876 साली गॅहॅम बेलने दूरध्वनीचा शोध लावला. तारेच्या माध्यमातून शब्द एका ठिकाणाहून दुस–या ठिकाणी ऐकू येवू लागला. 1895 साली मार्कोनी या इटालीयन शास्त्रज्ञाने बिनतारी संदेश–यंत्रणेचा शोध लावला. या मुळे भौगोलिक सिमापार करुन माणसाचा शब्द सर्वदूर जावू लागला. "मार्कोनी 1918 साली सप्टेंबर महिन्यात इंग्लडकडून ऑस्ट्रेलियाला पहिला रेडिओ – संदेश पाठवला. 1921 साली अमेरिकेत पीटसबर्ग येथे जगातील पहिले नभोवाणी केंद्र स्थापन करण्यात आले. तेंव्हापासून येथे सुरु झालेला नभोवाणीचा

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist Parbhani

प्रवास आता फार प्रगत अवस्थेत येऊन पोहचला आहे. ''3 भारतात या माध्यमाला 1926 साली प्रारंभ झाला. 1998 अखेर भारतात 195 केंद्रे आहेत. 183 पूर्ण स्वरुपाची तर 9 सहक्षेपण केंद्रे, 3 विविध भारताची स्वतंत्र केंद्रे आहेत.

दूरचित्रवाणी हे एक दृकश्राव्य माध्यम आहे हे माध्यमसुदधा मानवाच्या जीवनामध्ये अतिशय महत्वाचे ठरले आहे. '' दूरचित्रवाणी चा शोध 1926 मध्ये जे. एल. बेलर्ड यांनी लावला. या दूरचित्रवाणीतून पडद्यावर प्रसंग चालू असताना ते ऐकण्यात व बघण्यात येते. ''4. हे मानवाच्या जीवनातील महत्वाचे पाऊल होते. यामुळे माणसाला ऐकणे, पाहणे, आणि वाचणे या एकाच वेळी किया करता येतात.

संगणक (काम्प्युटर) या माध्यमामुळे सुदधा मुद्रणकला सुकर झाली. '' चार्ल्स बॅबेज (इंग्लड) हा संगणक विषयी मूळ संकल्पना मांडणारा पहिला शास्त्रज्ञ होय म्हणून त्याला संगणक संकल्पनेचे जनक मानल्या जाते.'' 5

आज इंटरनेटमुळे शाळा महाविद्यालयात विद्यार्थी यादी पासून, अभ्यासकम, विद्यार्थ्यांची माहिती ठेवल्या जात. व्यवसायात महत्वाची कामे करता येतात. ऑनलाईन खरेदी, रिझर्वेशन, जगभरातील जनसंपर्क, असे विविध फायदे आपणास घेता येतात. तंत्र ज्ञानाचे फायदे भरपूर आहेत. तसेच त्याच्या अति वापराचे तोटे ही अतिशय घातक आहेत. मेंदू हॅंग होण्या पर्यंत धोके होवू शकतात.

## संदर्भ


१. नेटवरुन - मुद्रित

२ श्री.अरुण खोरे - मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये.यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठ, नाशिक. प्र. आ. सप्टेंबर २००२ पृ.क्र.०३

३. श्री. चंद्रकांत भोंजळ - दृक - श्राव्य माध्यमासाठी लेखन कौशल्ये यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठ, नाशिक प्र. आ. सप्टेंबर २००२. पृ. ०३.

४. कदम ऋतुजा - प्रसार माध्यमांचे महत्व 'प्रज्ञा' विशेषांक. संपा. सा. द. सोनसळे प्र. आ. २०१७-१८ पृ. ५६.

५ किता - पृ. ५६.


❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani